गांधी एज्युकेशन सोसायटी कुंडलचे

# क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालय, कुंडल

# ता. पलूस जि. सांगली

अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत एक दिवशीय कार्यशाळा

विषयः **कोरोना काळातील आहार विहार आणि योगा**

दि. ३०/०७/२०२१

## अहवाल

आमचे क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयात शुक्रवार दिनांक ३०/०७/२०२१ रोजी शिवाजी विद्यापीठाच्या अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत कोरोना **'काळातील आहार विहार आणि योगा'** या विषयावर एक दिवशीय ऑनलाइन कार्यशाळा संपन्न झाली. सदर कार्यक्रमा करीता दोन सत्रांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक महाविद्यालयाचे क्रिडा विभागप्रमुख व्ही. डी. सावंत यांनी केले. यावेळी बोलताना त्यांनी महाविद्यालयात सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात क्रिडा विभागातील कार्याचा आढावा घेतला. त्यांनी या विभागामार्फत कार्यशाळा आयोजनाचे प्रयोजन स्पष्ट केले.

प्रथम सत्रामध्ये 'कोरोना काळातील आहार विहार आणि योगा' या विषयावर रामानंदनगर जि. सांगली येथील डॉ. चंद्रशेखर माने यांचे ऑनलाइन व्याख्यान झाले. त्यांनी आपल्या व्याख्यानांमध्ये आधुनिक काळातील वाढत्या ताणतणावाची माहिती दिली. त्यांनी विविध स्लाइडच्या माध्यमातून प्रमुख आसने व त्यांचे फायदे विशद केले.

दुसऱ्या सत्रामध्ये 'कोरोना काळातील आहार विहार आणि योगा' या विषयावर पलूस जि. सांगली येथील डॉ. अजित खाडे यांचे ऑनलाइन व्याख्यान झाले. त्यांनी आपल्या व्याख्यानांमध्ये भारतातील प्राचीन काळापासून चालत आलेल्या योगासन व प्राणायाम यांचे महत्व स्पष्ट केले. त्यांनी सूर्यनमस्कार व त्यांचे आधुनिक काळातील महत्व विशद केले.

यानंतर या एक दिवशीय ऑनलाइन कार्यशाळा कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. पी. बी. लाड यांनी अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयीन कार्याचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे आभार अग्रणी विभाग समन्वयक डॉ. व्ही. आर. माने यांनी मानले. यानंतर ऑनलाइन प्रशस्तीपत्रकांचे वितरण करण्यात आले. अशा प्रकारे एक दिवशीय कार्यशाळा संपन्न झाली.

सोबत- कार्यशाळेची छायाचित्रे

गांधी एज्युकेशन सोसायटी कुंडलचे

# क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालय, कुंडल
# ता. पलूस जि. सांगली

अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत एक दिवशीय कार्यशाळा

विषयः **महिला सबलीकरणात भाषा आणि संवाद कौशल्य यांचे महत्व**

दि. ३१/०७/२०२१

## अहवाल

आमचे क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयात शनिवार दिनांक ३१/०७/२०२१ रोजी शिवाजी विद्यापीठाच्या अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत कोरोना **'महिला सबलीकरणात भाषा आणि संवाद कौशल्य यांचे महत्व '** या विषयावर एक दिवशीय ऑनलाइन कार्यशाळा संपन्न झाली. सदर कार्यक्रमा करीता दोन सत्रांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक महाविद्यालयाच्या महिला सक्षमीकरण विभागाच्या सदस्या प्रा. सौ. ए. डी. पवार यांनी केले. यावेळी बोलताना त्यांनी महाविद्यालयातील महिला सक्षमीकरण विभागाच्या कार्याचा आढावा घेतला. त्यांनी या विभागामार्फत कार्यशाळा आयोजनाचे प्रयोजन स्पष्ट केले.

प्रथम सत्रामध्ये 'महिला सबलीकरणात भाषा आणि संवाद कौशल्य यांचे महत्व' या विषयावर लिबरल कॉलेज, पुणे येथील डॉ. प्रीती जोशी यांचे ऑनलाइन व्याख्यान झाले. त्यांनी आपल्या व्याख्यानांमध्ये बदलत्या काळातील भाषा आणि संवाद कौशल्य यांचे महत्व व आवश्यकता यांची माहिति दिली. त्यांनी विविध स्लाइडच्या माध्यमातून जागतिक पातळीवर वैशिष्ट्यपूर्ण कार्य केलेल्या महिलांची माहिती दिली..

दुसऱ्या सत्रामध्ये 'महिला सबलीकरणात भाषा आणि संवाद कौशल्य यांचे महत्व'या विषयावर ए. सी. एस. कॉलेज, पलूस येथील डॉ. संगीता पाटील यांचे ऑनलाइन व्याख्यान झाले. त्यांनी आपल्या व्याख्यानांमध्ये भारतातील महिला समोरील आव्हाने स्पष्ट केली.

विविध आव्हानांना  सामोरे जाताना भाषा आणि संवाद कौशल्य यांची उपयुक्तता विशद केले.

यानंतर  या एक दिवशीय  ऑनलाइन कार्यशाळा कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. पी. बी. लाड यांनी अध्यक्षीय मनोगतात  महाविद्यालयीन कार्याचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे आभार महिला  सक्षमीकरण विभागाच्या सदस्या प्रा. सौ. एस. पी. खरात यांनी मानले. यानंतर ऑनलाइन प्रशस्तीपत्रकांचे वितरण करण्यात आले. अशा प्रकारे एक दिवशीय कार्यशाळा संपन्न झाली.

सोबत- कार्यशाळेची छायाचित्रे